**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव दत्तात्रय निकम — अपीलकर्ता
रा. टेक्निकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १४,
ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, — उत्तरवादी
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** — श्री. सदाशिव दत्तात्रय निकम, रा. टेक्निकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा — कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर श्री. अभयकुमार जी. साळुंखे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा — सचीव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर श्री. आर.व्ही.दापके | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचीव श्री. जी.एल. ऐनापुरे यांच्याबाबत आपण मागितलेली चारपैकी दोन मुद्दयांची माहिती दिली व तीही चुकीची दिली. ऊर्वरित मुद्दयांची माहिती ७५१ दिवस विलंबाने दिली, त्यामुळे संस्थेवर दंडात्मक कारवाई करावी व आपल्या खर्चाचे रू.१००/- भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सदाशिव दत्तात्रय निकम यांनी केली.

श्री. निकम यांनी श्री. ऐनापुरे यांच्याबाबतची सन १९७० पासूनची माहिती मागितली होती. विविध ठिकाणांहून व वेगवेगळ्या शाखांमधून ३६ वर्षांची माहिती संकलित करून द्यावयाची होती. उपलब्ध झालेली माहिती विहित मुदतीत दिली. ऊर्वरित माहिती संकलित करण्यास विलंब झाला, याबद्दल संस्थेला एक वेळ माफ करण्यात यावे, अशी विनंती जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर श्री. आर. व्ही. दापके यांनी केली.

श्री. ऐनापुरे यांची लिन सर्व्हिस नामंजूर झाली, त्यांनी घेतलेल्या पगाराची रक्कम वसूल झाली, पण माहिती देताना हा प्रकार घडला नसल्याचे भासवून आपली दिशाभूल आणि शासनाच्या पैशाचा अपहार केला आहे, असे प्रतिपादन श्री. निकम यांनी केले. परंतु या संदर्भातील सर्व स्पष्टीकरण देण्याची तयारी असल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. दापके यांनी केले.

३६ वर्षांमधील व विविध ठिकाणची माहिती संकलित करून द्यावयाची असली तरी संस्थेने प्रमाणाबाहेर विलंब केला आहे. त्याबाबतचा खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांनी आठ दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री. दापके व अपिलीय प्राधिकारी श्री. अभयकुमार जी. साळुंखे यांनी दि. ७.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला खुलासा सादर केला. श्री. निकम यांच्या मूळ अर्जानुसार काही माहिती विहित मुदतीत देण्यात आली. काही माहिती उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात येऊन 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी समक्ष देण्यात आली. श्री. निकम यांना माहिती देऊनही पुनःपुन्हा त्याच स्वरूपाची माहिती ते मागत राहतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर नाहक ताण पडतो, असे या खुलाशात म्हटले आहे. सन १९९० ते १९९३ या काळातील लिन सर्व्हिस व वेतन याबद्दल भरणा केलेल्या रकमेच्या पावतीची प्रत 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी देण्यात आली, दिशाभूल करण्याचा भाग त्यात येत नाही. श्री. निकम यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे 'अर्जदारास अर्ज टपालाद्वारे पाठवावा लागला, तसेच वेळ आणि ये-जा साठी अतिरिक्त रू. १००/ खर्च झाला, तो मिळावा,' अशी मागणी केली आहे. हा खर्च देण्यास संस्था तयार

आहे. असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्याध्यक्ष श्री. अभयकुमार जी. साळुंखे यांचे निवेदन 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी सादर करण्यात आले असल्याचेही खुलाशात नमूद केले आहे. दरम्यानच्या काळात श्री. ऐनापुरे दि. ३१.१०.२००८ रोजी निवृत्त झाले आहेत.

विलंबाबाबतचे जन माहिती अधिकारी श्री. दापके व अपिलीय प्राधिकारी श्री. साळुंखे यांचे निवेदन मान्य करून विलंब क्षमापित करण्यात येत आहे. खर्चापोटी झालेली रक्कम रु.१००/- संस्थेकडून मिळण्याची अपीलकर्त्याची मागणी मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आपल्या खर्चापोटी रू.१००/- स्वामी संस्थेकडून मिळण्याची अपीलकर्ते श्री. सदाशिव दत्तात्रय निकम यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर रक्कम श्री. निकम यांना अदा करून जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांनी दि. ३०.१२.२००९ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. २३.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. इराप्पा तुकाराम नाईक
स्वयंभू गणेश टायर पॉईंट, ओम साई गॅरेज जवळ
ढोलगरवाडी फाटा (वैताकवाडी),ता.चंदगड,जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कुलसचिव,
वृत्तपत्र व जनसंज्ञापन विभाग,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप कुलसचिव,
वृत्तपत्र व जनसंज्ञापन विभाग,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४६/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०४.२००९ |
| ३. | उपस्थित<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** कुलसचिव,<br>वृत्तपत्र व जनसंज्ञापन विभाग,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक डॉ.राजेंद्र वडनेरे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उप कुलसचिव,<br>वृत्तपत्र व जनसंज्ञापन विभाग,<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक श्री.सुनील सीताराम बर्वे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.१२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०१.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.०९.२००८ |
| ८ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जनसंज्ञापन व वृत्तपत्र विद्या पदविकेत अनुत्तीर्ण झालेल्या श्री.आनंदराव द.कांबळे या विद्यार्थ्याबाबतची माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.इराप्पा तुकाराम नाईक या नावे राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्यात आले आहे. राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२८.०४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळीसुध्दा अपीलकर्ता गैरहजर होते.

श्री.इराप्पा नाईक हा एक कामगार असून अर्ज व अपील त्यांच्या नावे असले तरी प्रत्यक्षात त्यांनी माहिती मागितलेली नाही. श्री.आनंदा कांबळे यांना त्यांच्या संदर्भातील सर्व माहिती यापूर्वीच देण्यात आली असून श्री.नाईक यांच्या अगर अन्य कुणा व्यक्तींच्या नावे श्री.कांबळे यांनीच अर्ज पाठविला असावा, असे लेखी निवेदन कोल्हापूर येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ (पत्रकारिता) केंद्राचे प्रमुख प्रा.वसंत म.सप्रे यांनी विद्यापीठाला पाठविले आहे. श्री.नाईक यांच्याकडे प्रत्यक्ष प्रतिनिधी पाठविला असता अर्जाशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे आढळले. आपण असा कोणताही अर्ज केलेला नाही. आपल्या नावे श्री.आनंदा कांबळे यांनी खोडसाळपणे माहिती मागविली असल्याची शक्यता आहे. आपल्या नावे त्यांनी खोटा अर्ज केला आहे, असे श्री.नाईक यांनी दि.३१.१२.२००७ रोजी तीन साक्षीदारांसमक्ष लेखी दिले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक डॉ.राजेंद्र वडनेरे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. हे लक्षात घेता विद्यापीठाने केवळ तांत्रिकतेवर भर न देता संबंधित विद्यार्थ्याला मूळ प्रश्नात मदत करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसते. याउलट श्री.नाईक यांच्या नावे अर्ज व अपील करणाऱ्या व्यक्तींने माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चा गैरवापर

केला आहे. एवढेच नव्हे, तर सर्व यंत्रणांची फसवणूक करुन त्यांचा वेळ व श्रम यांचा अपव्यय केला आहे. त्याची कसून चौकशी होणे गरजेचे आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. श्री.इराप्पा तुकाराम नाईक यांच्या नावे केलेला अर्ज व अपील यांबाबत जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, वृत्तपत्र व जनसंज्ञापन विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक श्री.सुनील सीताराम बर्वे यांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी व चंदगड पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकरवी चौकशी करुन व आवश्यक ती पुढील कार्यवाही करुन एक महिन्यात आयोगाला अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : २३/१२/२००९**

प्रत,

पोलीस निरीक्षक, चंदगड पोलिस स्टेशन, ता.चंदगड, जि.कोल्हापूर यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अभिजित आनंदा परीट
मु.पो.गोठण गल्ली, ता.आजरा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आजरा,
ता.आजरा, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा,
ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अभिजित आनंदा परीट
मु.पो.गोठण गल्ली, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, आजरा,
ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.एन.एच.राऊत

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा,
ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.व्ही.के.नाईक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मागणी केल्यापासून सहा महिन्यांनी व अपूर्ण माहिती दिल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.अभिजीत आनंदा परीट यांनी केली.

श्री.परीट यांनी सन १९९८ ते २००८ या काळातील माहिती मागितली होती. करमणूक निरीक्षक, गडहिंग्लज विभाग व जिल्हा कार्यालय, गडहिंग्लज यांच्याकडून संकलित करून ही माहिती प्राप्त करून घेण्यात येईल, असे श्री.परीट यांना विहित मुदतीत कळविले होते. माहिती संकलित होण्यास विलंब लागला. १९४ पानांची माहिती गावांच्या तपशिलासह पूर्वी दिली. ऊर्वरित माहिती आधी संकलित झाली असून ती देत आहोत, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.व्ही.के.नाईक यांनी सांगितले. तसेच श्री.परीट यांनी आपण दारिद्र्यरेषेखालील असल्याचे नमूद केले असले तरी दारिद्र्यरेषेखालील यादीत समावेश असल्याचा पुरावा दिलेला नव्हता, याचाही त्यांनी उल्लेख केला.

अपीलकर्त्यास तीन दिवसात माहिती निःशुल्क द्यावी व जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.व्ही.के.नाईक यांनी दि.२.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल

सादर केला. ऊर्वरित माहिती संकलित करून ६१८ पानांच्या प्रती निःशुल्क देण्यात आल्या, तशी पोहोच श्री.परीट यांना दिलेली आहे. आपल्याकडे निवासी नायब तहसीलदार संजय गांधी व निवडणूक नायब तहसीलदार अशा अनेक पदांचा कार्यभार होता, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.व्ही.के.नाईक यांनी त्यात नमूद केले आहे. ते लक्षात घेता अपीलकर्त्याची शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गोपाळ आप्पा कुंभार
कुंभारगल्ली, कैकाडी महाराज मठाजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोपाळ आप्पा कुंभार
कुंभारगल्ली, कैकाडी महाराज मठाजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.सुभाष गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.मंगेश चितळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

विनापरवाना बांधकामाच्या संदर्भात पंढरपूर नगरपरिषदेने दिलेल्या नोटिशीच्या अनुषंगाने कारवाई करण्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा आपण मागितला होता. परंतु आपल्याला चुकीची माहिती देण्यात आली. नगरपरिषदेने पोलिसांकडे फिर्याद दाखल केल्याचे आपल्याला सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात त्यानंतर काही दिवसांनी फिर्याद दाखल केली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.गोपाळ आप्पा कुंभार यांनी केले.

श्री.कुंभार यांना सर्व माहिती विहित मुदतीत देण्यात आली. खुलाशाची मागणी करणे माहितीच्या अधिकारात येत नाही, म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांनी त्यांचे अपील फेटाळले. पोलिसांकडील तक्रारी संबंधीची माहिती त्यांनी मूळ अर्जात मागितली नव्हती. ती 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त मागितली. गुन्हा दाखल करण्याबाबत सन २००२ मध्ये नगरपरिषदेने पोलिसांना पत्र दिले होते. परंतु गुन्हा दाखल न केल्याचे पोलिसांनी कळविले, याची माहितीही श्री.कुंभार यांना दिली, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.मंगेश चितळे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. अपीलकर्ता श्री.गोपाळ आप्पा कुंभार व श्री. बाळासाहेब कुंजाप्पा कुंभार यांच्यात मिळकतीच्या हिश्श्यावरून वाद चालू असून दावा न्यायालयात आहे, असेही जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,श्री.मंगेश चितळे यांनी नमूद केले. श्री.कुंभार यांना देण्यात आलेल्या

माहिती संदर्भातील प्रतींसह अहवाल जन माहिती अधिकारी यांनी तीन दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.मंगेश चितळे यांनी दि.२१.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२९.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. बापूराव केराप्पा मासाळ — अपीलकर्ता
मु.पो.मरवडे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी मरवडे, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर<br>श्री. बी. आर. माळी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी मरवडे, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर<br>श्री. डी. एस. इंगोले | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.४.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

<u>**विवेचन**</u>

अपीलकर्ता श्री. बापूराव केराप्पा मासाळ यांनी मंडल अधिकारी व तलाठी यांच्या संदर्भात १० मुद्दयांची माहिती मागितली होती. त्यापैकी सात मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, मरवडे, ता. मंगळवेढा यांनी मुदतीत दिली. तसेच राहिलेल्या तीन मुद्दयांची माहिती

तहसीलदार कार्यालयांशी संबंधित असल्यामुळे वरिष्ठ कार्यालयाकडून घ्यावी, असे श्री. मासाळ यांना कळविले. परंतु श्री. मासाळ यांनी त्याप्रमाणे तहसील कार्यालयाकडून माहिती न घेता अपील केले. ऊर्वरित तीन मुद्दयांची माहिती त्यावेळी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मंगळवेढा यांच्याकडून घेऊन निःशुल्क देण्यात आली. श्री. मासाळ माहितीबाबत योग्य ठिकाणी अर्ज व अपिले करीत नाहीत व माहिती न मिळाल्याची तक्रार करतात. केवळ त्रास देण्यासाठी ते अशा प्रकारची कार्यपध्दती अवलंबतात, असे जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, मरवडे श्री. डी.एस. इंगोले व अपिलीय प्राधिकारी तहसीलदार, मंगळवेढा श्री. बी.आर. माळी यांनी लेखी व तोंडी नमूद केले. तत्कालीन तहसीलदार श्रीमती जयश्री जाधव यांनी सात महिन्यांनंतर अपिलाचा निर्णय दिला. वृध्दापकाळ राष्ट्रीय निवृत्ती योजना भ्रष्टाचार प्रकरणी त्या निलंबित आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे
तलाठी कॉलनी, इस्लामपूर, ता.वाळवा,
जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,सांगली, जि.सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,
ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७२+५५७+५५८+५७५+७७३/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.११.२००९,दि.२०.११.२००९,दि.२०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे
तलाठी कॉलनी, इस्लामपूर, ता.वाळवा,
जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,सांगली, जि.सांगली तर्फे प्रतिनिधी श्री.ए.जी.मगदूम

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,
ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-२) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण ५ वर्षे संस्थेत सेवा करत असून मागितलेली माहिती दिली जात नाही, खोटी व अपुरी माहिती दिली जाते. खोटी कागदपत्रे करुन चुकीच्या नोंदी ठेवल्या जात आहेत व तशी माहिती दिली जात आहे. तसेच आपले सेवापुस्तक मागणी करुनही दिले जात नाही. त्यानंतर शिक्षक नेमणुकीबाबत दिलेल्या जाहिरातीबाबतची माहिती १० दिवसांत देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त मान्य करुनही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे यांनी केली.

श्री.साळुंखे विविध स्वरुपाची माहिती मागणारे अर्ज व अपिले करीत असतात. त्यांच्या सर्व अर्जांबाबत उपलब्ध माहिती त्या त्या वेळी त्यांना देण्यात आली आहे. त्यांच्या सेवापुस्तकाबाबत मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे व त्यांच्या सत्य प्रती सादर करण्यास कळवूनही त्यांनी पूर्तता केलेली नाही. शिक्षक नेमणुकीबाबत जाहिरात दिलेली नव्हती, तर संस्थेच्या नोटिस बोर्डावर जाहीर निवेदन देऊन त्यानुसार आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्यातही श्री.साळुंके यांचा समावेश होता. या निवेदनाची छायांकित प्रत त्यांना ३ वेळा देण्यात आली आहे. कोणतीही माहिती त्यांना द्यावयाची राहिलेली नाही. तरीही माहिती मिळाली नसल्याचे व खोटी असल्याचे नमूद करुन श्री.साळुंखे दिशाभूल करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील यांनी केले.

श्री.साळुंखे यांनी मागितलेल्यातील जी माहिती मिळाली नाही अशी त्यांची तक्रार होती ती देण्याचे आदेश प्रथम अपिलाच्या सुनावणीत दिले होते. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. श्री.साळुंखे यांच्या अन्य तक्रारी हा प्रशासकीय कार्यवाही विषयक भाग आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,सांगली, जि.सांगली तर्फे प्रतिनिधी श्री.ए.जी.मगदूम यांनी

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पहाता श्री.साळुंखे यांना जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील यांनी माहिती दिली आहे. तसेच दप्तराच्या स्थलांतरामुळे व तत्सम कारणांमुळे विहित मुदतीत न देता आलेली माहिती नंतर दिली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.आर.आर.पाटील यांनी नमूद केले असून अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,सांगली श्री.एन.बी.पाटील यांनी ते रास्त असल्याचे नमूद केले आहे. जावक बार्शनशी-सारखी कागदपत्रे बनावट व खोटी असल्याचा श्री.साळुंके यांचा आरोप आहे. तथापि या आरोपाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २९/१२/२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे
तलाठी कॉलनी, इस्लामपूर, ता.वाळवा,
जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,सांगली, जि.सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,
ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७२+५५७+५५८+५७५+७७३/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.११.२००९,दि.२०.११.२००९,दि.२०.११.२००९ |
| ३. | उपस्थित | |

**अपीलकर्ता** - श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे
तलाठी कॉलनी, इस्लामपूर, ता.वाळवा,
जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,सांगली, जि.सांगली तर्फे प्रतिनिधी श्री.ए.जी.मगदूम

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,
ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-२) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण ५ वर्षे संस्थेत सेवा करत असून मागितलेली माहिती दिली जात नाही, खोटी व अपुरी माहिती दिली जाते. खोटी कागदपत्रे करुन चुकीच्या नोंदी ठेवल्या जात आहेत व तशी माहिती दिली जात आहे. तसेच आपले सेवापुस्तक मागणी करुनही दिले जात नाही. त्यानंतर शिक्षक नेमणुकीबाबत दिलेल्या जाहिरातीबाबतची माहिती १० दिवसांत देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त मान्य करुनही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामचंद्र विष्णू साळुंखे यांनी केली.

श्री.साळुंखे विविध स्वरुपाची माहिती मागणारे अर्ज व अपिले करीत असतात. त्यांच्या सर्व अर्जांबाबत उपलब्ध माहिती त्या त्या वेळी त्यांना देण्यात आली आहे. त्यांच्या सेवापुस्तकाबाबत मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे व त्यांच्या सत्य प्रती सादर करण्यास कळवूनही त्यांनी पूर्तता केलेली नाही. शिक्षक नेमणुकीबाबत जाहिरात दिलेली नव्हती, तर संस्थेच्या नोटिस बोर्डावर जाहीर निवेदन देऊन त्यानुसार आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्यातही श्री.साळुंके यांचा समावेश होता. या निवेदनाची छायांकित प्रत त्यांना ३ वेळा देण्यात आली आहे. कोणतीही माहिती त्यांना द्यावयाची राहिलेली नाही. तरीही माहिती मिळाली नसल्याचे व खोटी असल्याचे नमूद करुन श्री.साळुंखे दिशाभूल करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील यांनी केले.

श्री.साळुंखे यांनी मागितलेल्यातील जी माहिती मिळाली नाही अशी त्यांची तक्रार होती ती देण्याचे आदेश प्रथम अपिलाच्या सुनावणीत दिले होते. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. श्री.साळुंखे यांच्या अन्य तक्रारी हा प्रशासकीय कार्यवाही विषयक भाग आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,सांगली, जि.सांगली तर्फे प्रतिनिधी श्री.ए.जी.मगदूम यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पहाता श्री.साळुंखे यांना जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली श्री.आर.आर.पाटील यांनी माहिती दिली आहे. तसेच दप्तराच्या स्थलांतरामुळे व तत्सम कारणांमुळे विहित मुदतीत न देता आलेली माहिती नंतर दिली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.आर.आर.पाटील यांनी नमूद केले असून अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,सांगली श्री.एन.बी.पाटील यांनी ते रास्त असल्याचे नमूद केले आहे. जावक बारनिशी-सारखी कागदपत्रे बनावट व खोटी असल्याचा श्री.साळुंके यांचा आरोप आहे. तथापि या आरोपाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २९/१२/२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. आण्णासाहेब देवाप्पा शिरोटे — अपीलकर्ता
डॉ. मगदूम सोसायटी, प्लॉट नं.७५,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) — उत्तरवादी
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, आदर्श शिक्षण संस्था, कोथळी,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८१ + ४८२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. आण्णासाहेब देवाप्पा शिरोटे डॉ. मगदूम सोसायटी, प्लॉट नं.७५, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्रीमती प्रतिभा शि. सुर्वे |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | चेअरमन, आदर्श शिक्षण संस्था, कोथळी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर श्री. सातगोंडा सुरगोंडा पाटील |

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४८१ / कोल्हापूर | ४.९.२००८ | १.१०.२००८ | १३.१०.२००८ | २४.१०.२००८ |
| ४८२ / कोल्हापूर | ३०.९.२००८ | २५.१०.२००८ | -- | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार ठरावाची प्रत मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. आण्णासाहेब देवाप्पा शिरोटे यांनी केली. अपीलकर्ता श्री. शिरोटे, त्यांची पत्नी, त्यांची कन्या आदी सर्व व्यक्ती विविध स्वरूपाचे अर्ज व तक्रारी करून संस्थेला त्रास देतात. या संदर्भातील कायदेशीर मुद्दयांच्या अनुषंगाने वकीलाने दिलेल्या सल्यानुसार श्री. शिरोटे यांना माहिती नाकारली. अपीलकर्ता स्वतः मुख्याध्यापक आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, आदर्श शिक्षण संस्था, कोथळी यांनी केले. श्री. शिरोटे यांनी मागितलेली माहिती आपल्या कक्षेतील नसून सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी केलेल्या अपिलांवर कळविले होते, असे अपिलीय प्राधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्रीमती प्रतिभा शि. सुर्वे यांनी सांगितले.

संबंधित ठरावाची माहिती दोन दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार आपल्याला माहिती न देता दि. १४.९.२००९ रोजी दिली, तसेच अपील न केलेल्या अन्य अर्जा संदर्भातील माहिती आयोगाच्या आदेशानुसार दोन दिवसांत न देता दि. २३.९.२००९ रोजी दिली, अशी तक्रार अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. १४.९.२००९ व २४.९.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगाकडे केली. याबाबत आयोगाने दि. ३०.९.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, आदर्श शिक्षण संस्था, कोथळी यांच्याकडून खुलासा मागविला. संबंधित सर्व माहिती दि. १०.९.२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास रजिस्टर्ड टपालाने पाठविण्यात आली असल्याचे संबंधित माहितीच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, आदर्श शिक्षण संस्था, कोथळी श्री. सातगोंडा सुरगोंडा पाटील यांनी दि. ८.१०.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १७.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिपक शंकरराव चव्हाण
कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, शाहूपुरी , कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, शाहूपुरी , कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिपक शंकरराव चव्हाण
कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, शाहूपुरी , कोल्हापूर

**मूळ अर्जदार** - श्री.प्रताप हरिभाऊ पाटील
घ.नं.१८१२, बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एल.टी.भोसले

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,<br>कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,<br>कोल्हापूर मुख्य कार्यालय, शाहूपुरी , कोल्हापूर श्री.दि. शं.चव्हाण | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.९.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मूळ अर्जदार श्री.प्रताप हरिभाऊ पाटील यांनी मागितलेली माहिती कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याच्या कारणावरून नाकारली. परंतु बँकेला हा अधिनियम लागू होत असून माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी दिला. तो चुकीचा असून रद्द करावा, या मागणीसाठी अपीलकर्ता कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. श्री.दिपक शंकरराव चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पाटील यांनी दोन वर्षांच्या काळातील विस्तृत माहिती मागितली असून मागणी संदिग्ध स्वरूपाची आहे. आपल्या बँकेला शासकीय भागभांडवल मिळालेले नाही. स्वभांडवलावर बँक व्यवहार करीत आली आहे. बँकेने घेतलेल्या कर्जाला शासनाची हमी नाही. या बाबी लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बँकेला लागू होत नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.चव्हाण व त्यांचे प्रतिनिधी ॲड.पी.जे.वाघ यांनी केले.

माहिती बँकेच्या स्तरावरील असल्यामुळे बँकेने द्यावी, असे कळविले. अर्जात नमूद कलेल्या अहवालाच्या प्रती आपल्या कार्यालयाकडे येत नाहीत, तर थेट बँकेला पाठविल्या जातात. तसेच सहकार आयुक्त, पुणे यांच्या परिपत्रकामध्ये जिल्हा सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हा बँकेने निश्चित केल्याप्रमाणे नाबार्डमार्फत शेतकऱ्यांना कर्ज दिले जाते, आदि बाबी लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) अन्वये बँका हे सार्वजनिक प्राधिकरण ठरते. त्यामुळे बँकेने माहिती दिली पाहिजे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.एल.टी.भोसले यांनी केले. संबंधित अहवाल बँकेकडून प्राप्त करून घेऊन योग्य ते शुल्क आकारून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर यांनी पुरवावा व संबंधित शुल्काची रक्कम बँकेकडे जमा करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत असल्याचा अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ)

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय सावळा लष्कर
जिद्द निवास, काशिळ, पो.काशिळ, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग,
नागपूर, गिरी पेठ, अमरावती रोड, नागपूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपायुक्त, अप्पर आयुक्त,
आदिवासी विकास विभाग, नागपूर यांचे कार्यालय,
गिरी पेठ, अमरावती रोड, नागपूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय सावळा लष्कर
जिद्द निवास, काशिळ, पो.काशिळ, ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अधीक्षक व गृहपाल या पदांच्या भरती संदर्भातील इतिवृत्त, शासन निर्णय आदिंची आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांनी योग्य व परिपूर्ण माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय सावळा लष्कर यांनी केली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे आयोगाच्या पूर्वपरवानगीने गैरहजर होते. श्री.लष्कर यांना संबंधित निवडीबाबतच्या इतिवृत्तासह सर्व माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. तथापि श्री.लष्कर यांना अन्य तपशील हवा असल्यास तो देण्यात यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.११.१२.२००९**